# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (पावसाळी) अधिवेशन, २०२४

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### पाचाड (ता.पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर) गावात रोजगार हमी योजनेचे जॉबकार्ड तयार करुन लाखो रुपयांचा गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१) ९७९३ (१५-०७-२०२१) श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाचाड (ता.पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर) गावात धनदांडग्यांच्या नावावर रोजगार हमी योजनेचे जॉबकार्ड तयार करुन लाखो रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोविड सेंटरमध्ये उपचार घेणारे रुग्ण रोजगार हमी योजनेच्या कामावर दाखवून शासनाची फसवणूक करुन गैरव्यवहार करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त तालुक्यात मजुरांसाठी रोहयोंतर्गत कोट्यवधी रुपयांची कामे मंजूर असून त्या कामावर मजुरांऐवजी धनदांडगे व्यापारी, वकील, कारखान्याचे माजी एमडी, निमशासकीय कर्मचारी, प्राप्तीकर भरणाऱ्या व्यक्ती कामावर दाखविण्यात येऊन गैरव्यवहार करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गैरव्यवहार करणाऱ्या दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे (१८-०६-२०२४) :** (१) हे खरे नाही.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) प्रकरणी चौकशी करण्यात आली असून संबंधित दोषी कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जळगाव जिल्ह्यातील ग्रामीण भागातील मुक्कामी बसफेऱ्या पूर्ववत सुरु ठेवण्याबाबत

**(२) १७६४३ (२५-०३-२०२३) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्ह्यात कोरोनापूर्वी नियमित मुक्कामी १८० बस फेऱ्यापैकी ३६ मुक्कामी बस फेऱ्या बंद असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मुक्कामी बस फेऱ्या बंद असल्याने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची व प्रवाशांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन जळगाव जिल्ह्यातील ग्रामीण भागातील मुक्कामी बसफेऱ्या पूर्ववत सुरु ठेवण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (३१-०५-२०२४) :** (१), (२) नाही.

(३) व (४) जळगांव जिल्ह्यात कोरोनापूर्वी १८० मुक्कामी फेऱ्या चालविण्यात येत होत्या व सद्य:स्थितीत १८८ मुक्कामी फेऱ्या चालविण्यात येत आहेत. त्यामुळे विद्यार्थी व प्रवाशांची कोणतीही गैरसोय होत नाही.

---

## जळगाव जिल्ह्यातील महात्मा गांधी रोजगार हमी योजनेंतर्गत मुक्ताईनगर व बोदवड येथे मजूरांना कमी रोजगार उपलब्ध होत असल्याबाबत

**(३) १९२७१ (०८-०८-२०२३) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुक्ताईनगर व बोदवड तालुक्यात महात्मा गांधी रोजगार हमी योजनेंतर्गत मजुरांची कामाची मागणी असूनही अधिकाऱ्यांच्या कामचुकारपणामुळे अत्यंत कमी मजूरांना रोजगार उपलब्ध होतआहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मजुरांना कामे देण्यांबाबत तसेच दोषी अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे (१४-०६-२०२४) :** (१) व (२) हे खरे नाही.

मजुरांच्या कामाच्या मागणी नुसार व कामानुसार मुक्ताईनगर व बोदवड तालुक्यात मग्रारोहयो अंतर्गत कामे उपलब्ध करून देण्यात आली असून काम मागणी अर्ज प्राप्त झाल्यावर कामे उपलब्ध करून देण्यात येतात.

मुक्ताईनगर तालुक्यात २३७७३ मनुष्य दिवस व बोदवड तालूक्यात २४८८६ मनुष्य दिवस निर्माण केले आहेत. मुक्ताईनगर तालुक्यात मजुरीवर ४७.४९ लक्ष खर्च झालेला असून बोदवड तालुक्यात मजूरीवर ७१.४५ लक्ष खर्च झालेला आहे.

मुक्ताईनगर तालुक्यात ग्रामपंचायत आणि यंत्रणा स्तरावरील एकूण ३३४० विविध वैयक्तिक व सार्वजनिक स्वरुपाची कामे सुरु आहेत.त्यानुषंगाने मुक्ताईनगर तालुक्यात सद्य:स्थितीत ३२ ग्रामपंचायतीमध्ये ९८ कामांवर ६०७ मजुर कामे करीत आहेत.

बोदवड तालुक्यात ग्रामपंचायत स्तरावरील १३१४ विविध वैयक्तिक व सार्वजनिक स्वरुपाची कामे सुरु आहेत. त्यानूषंगाने बोदवड तालुक्यात सद्य:स्थितीत १५ ग्रामपंचायतींमध्ये ५४ कामांवर २२३ मजुर काम करत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आदिवासी विभागाद्वारा संचालित खाजगी अनुदानित प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळेतील कार्यरत शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या संदर्भातील शासन निर्णय रद्द करण्याबाबत

**(४) १९४१२ (०४-०८-२०२३) श्री.सुधाकर अडबाले, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.किरण सरनाईक, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विभागाद्वारा संचालित खाजगी अनुदानित प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळेतील कार्यरत शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या संदर्भाने काम नाही, वेतन नाही अशा प्रकारचा जाचक शासन निर्णय दिनांक ८ जून,२०१६ रोजीचा काढून कर्मचाऱ्यांना वेठीस धरले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक ८ जून २०१६ रोजीचा शासन निर्णयामुळे राज्यातील आदिवासी विभागामार्फत संचालित शाळांतील कर्मचाऱ्यांवर अन्याय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने आदिवासी विभागातील कर्मचाऱ्यांच्या बाबतीत ही दुटप्पी भूमिका शासनाने मागे घेण्यासाठी दिनांक ८ जून २०१६ चा शासन निर्णय रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (०५-०६-२०२४) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेल्या याचिका क्र. ४३०५/२०१४ व याचिका क्र. ५३०३/२०१४ मध्ये मा.उच्च न्यायालयाने अनुक्रमे दिनांक २७ जानेवारी, २०१५ व दिनांक १६ फेब्रुवारी, २०१५ रोजी अतिरिक्त ठरलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसंदर्भात पारित केलेल्या आदेशाच्या अनुषंगाने सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दिनांक १ एप्रिल, २०१६ च्या शासन निर्णयान्वये विजाभज आश्रमशाळातील अतिरिक्त ठरलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्याचे समायोजन होईपर्यंत त्यांना “काम नाही, वेतन नाही” धोरण लागू करण्यात आलेले आहे.

स्वयंसेवी संस्थांकडून आदिवासी विद्यार्थ्यासाठी चालविल्या जाणाऱ्या मान्यताप्राप्त अनुदानित आश्रमशाळा, शासनाच्या ध्येयधोरणानुसार चालविल्या जात नसल्यामुळे सामाजिक न्याय विभागाच्या धर्तीवर, आश्रम शाळांची मान्यता रद्द केल्यानंतर अशा शाळातील कायम मान्यता प्राप्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे नियमानुसार समायोजन होईपर्यंतच्या कालावधीत “काम नाही, वेतन नाही” हे धोरण दिनांक ८

जून, २०१६ च्या शासन निर्णयान्वये लागू करण्यात आले आहे. मात्र विद्यार्थी संख्या कमी झाल्यामूळे आश्रमशाळेचा एखादा वर्ग/तुकडी कमी झाल्यास मात्र शाळा सुरु असल्यास अतिरिक्त ठरलेल्या शिक्षक /शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन बंद न करता त्यांचे समायोजन होईपर्यंत त्यांचे वेतन चालू ठेवण्याबाबत दिनांक २९ एप्रिल, २०१७ च्या शासन निर्णयान्वये सूचना देण्यात आल्या आहेत.

अनुदानित आश्रमशाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी अतिरिक्त ठरल्यास त्यांचे नियमानुसार समायोजन होईपर्यंतच्या कालावधीत "काम नाही, वेतन नाही" हे धोरण विजाभज आश्रमशाळेतील अतिरिक्त ठरलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना देखील लागू करण्यात आलेले आहे. त्यामूळे "काम नाही, वेतन नाही" हे धोरण केवळ आदिवासी विभागातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना लागू करण्यात आले आहे, अशी वस्तुस्थिती नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## आदिवासी प्रकल्पातील इंग्रजी माध्यम नामांकित शाळांमधील विद्यार्थी प्रवेश बंद करण्यात आल्याबाबत

**(५) २०४०० (०४-०८-२०२३) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी प्रकल्पातील इंग्रजी माध्यम नामांकित शाळांमधील विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया प्रकल्प कार्यालयामार्फत केली जात असून, शाळांमध्ये प्रवेश देणे बंद करण्यात आल्यामुळे आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचे नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नामांकित शाळांमध्ये आदिवासी मुलांना शिक्षण देण्याचा निर्णय रद्द केला आहे काय,

(३) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आह काय, चौकशीच्या अनुषंगाने आदिवासी विद्यार्थ्यांना प्रकल्प कार्यालयामार्फत नामांकित शाळांमध्ये प्रवेश देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (३०-०५-२०२४) :** (१) हे खरे नाही.

(२) नामांकित शाळांमध्ये आदिवासी मुलांना शिक्षण देण्याचा निर्णय रद्द केलेला नाही.

(३) नामांकित शाळांना विद्यार्थी वाटप करण्यापूर्वी सदर नामांकित शाळांचे गुणांकन करणे आवश्यक असल्याने सर्व अपर आयुक्त, आदिवासी विकास यांना नामांकित शाळांचे गुणांकन करुन प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बुलढाणा जिल्ह्यातील शिंदखेडा राजा येथील ऐतिहासिक वस्तूंच्या दुरवस्थेचा प्रश्न निर्माण झाला असल्याबाबत

**(६)२०७८१ (०८-०८-२०२३) श्री.रमेशदादा पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, प्रा.राम शिंदे, श्री.निलय नाईक :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) बुलढाणा जिल्ह्यातील शिंदखेडा राजा येथील भारतीय पुरातत्त्व विभागाच्या अखत्यारित असलेल्या शिंदखेडा राजा परगाण्याचे राजे लखोजीराव जाधव यांचे समाधी स्थळ,पुतळा,बारव,रामेश्वर मंदिर,चांदणी तलाव आदी सर्व वास्तूंची दुरावस्था मोठ्या प्रमाणात होत असतानाही पुरातन विभागाकडून कोणतीच उपाययोजना केली जात नसल्याची बाब माहे मे २०२३मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे खरे आहे काय,
(२)असल्यास या पुरातन वास्तूचे जतन करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे काय,
(३)नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार (१४-०५-२०२४) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्नाधीन स्मारकांपैकी (१) राजे लखुजीराव जाधव समाधी, (२) रामेश्वर मंदिर, (३) चांदणी तलाव ही स्मारके केंद्र संरक्षित स्मारक म्हणून घोषित असून भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, नागपूर मंडळ यांचे अखत्यारित आहेत, तसेच पुतळा बारव हे स्मारक केंद्र संरक्षित स्मारक म्हणून घोषित करण्याविषयी प्राथमिक अधिसूचना भारतीय पुरातत्व सर्वेक्षण यांनी प्रसिध्द केली आहे. यासाठीच्या आवश्यक भुसंपादनाची प्रक्रिया जिल्हाधिकारी, बुलढाणा यांचेकडून सुरु आहे.

प्रश्नाधीन केंद्र संरक्षित स्मारकांपैकी रामेश्वर मंदिर व लखुजीराव जाधव समाधी यांचे काम भारतीय पुरातत्व सर्वेक्षण यांचेमार्फत प्रगतीपथावर आहे व चांदणी चांदणी तलावाचे काम पूर्ण झाले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर शहरातील दक्षिण क्षेत्राामध्ये सांस्कृतिक केंद्राच्या इमारतीचे काम अपूर्ण असल्याबाबत

**(७) २०८२० (०८-०८-२०२३) श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर शहरातील दक्षिण क्षेत्रामध्ये ६ कोटी १७ लाख रुपयांचा खर्च करुन बांधण्यात येणाऱ्या सांस्कृतिक केंद्राच्या इमारतीचे बांधकाम करारानुसार माहे मार्च,२०२३ मध्ये पूर्ण होणे अपेक्षित असतानाही अद्याप या इमारतींचे बांधकाम पूर्ण झाले नसल्याची बाब माहे जून,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी बांधकामास विलंब होण्यामागील कारणे काय तसेच सदर कामाला विलंब करण्याऱ्या संबंधित कंत्राटदार कंपनीवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार (१४-०५-२०२४) :** (१) नागपूर शहरातील दक्षिण क्षेत्रामध्ये बांधण्यात येणारी सांस्कृतिक केंद्राची इमारत हा विषय केंद्र शासनाच्या क्षेत्रिय सांस्कृतिक केंद्राच्या अखत्यारित येतो. तसेच, यासाठी केंद्र शासनाच्या वतीने निधी उपलब्ध करुन देण्यात येतो.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील वनविभागातील आदिवासींचे वनजमिनीवरील अतिक्रमण कायम करणेबाबत

**(८) २०९८० (०५-०१-२०२४) श्री.एकनाथराव खडसे, श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासींच्या वनजमिनीवरील अतिक्रमण कायम करणेबाबत माहे, सप्टेंबर २०२३ रोजी वा त्यासुमारास तालुकानिहाय वनदावे प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित वनदाव्यांची सुनावणी घेवून सदर वनदावे नियमानुकूल करणेबाबत व कालबध्द कार्यक्रम आखून सदरहू आदिवासींना जमिनी तात्काळ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (०६-०६-२०२४) :** (१) हे खरे आहे.

अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम २००६ व नियम २००८ आणि सुधारीत नियम, २०१२ अंतर्गत प्राप्त झालेल्या वनहक्क दाव्यांची माहे सप्टेंबर, २०२३ मधील वस्तुस्थिती खालीलप्रमाणे आहे :

उपविभागस्तरीय वनहक्क समिती: वनहक्कदाव्याचा प्रकार प्राप्त (दावे+अपिल) मान्य (दावे+अपिल) अमान्य (दावे+ अपिल) प्रलंबित (दावे+अपिल)

वैयक्तिक ३७६६०७ १५९९९५ २०९३५३ ७२५९

सामुहिक ११११५ ९३४० १५४४ २३१

जिल्हास्तरीय वनहक्क समिती : वनहक्कदाव्याचा प्रकार प्राप्त (दावे+अपिल) मान्य (दावे+अपिल) अमान्य (दावे+ अपिल) प्रलंबित (दावे+अपिल)

वैयक्तिक २७९८१२ १९८९९१ ७६६६२ ४१५९

सामुहिक ९४७६ ८६२४ ४९२ ३६०

(२) अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम २००६ व नियम २००८ आणि सुधारीत नियम, २०१२ च्या अंमलबजावणीच्या आढावा घेण्यासाठी मा.मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय सनियंत्रण समिती गठीत करण्यात आलेली आहे. सदर समितीच्या बैठका वेळोवेळी आयोजित करण्यात येतात.या बैठकांमध्ये प्रलंबित वनहक्क प्रकरणांचा आढावा घेऊन सदर प्रकरणे निकाली काढण्याच्या सूचना देण्यात येतात. राज्यस्तरीय संनियंत्रण समितीच्या दिनांक २०/०९/२०२३ रोजी पार पडलेल्या बैठकित उपविभागीय वनहक्क समिती व जिल्हाधिकारी वनहक्क समिती स्तरावरील प्रलंबित असलेले वैयक्तिक वनहक्क दावे, सामुहिक वनहक्क दावे, प्रमाण पत्र ७/१२ वाटप व अपिल प्रकरणे मोहिम स्वरूपात निकाली काढण्याबाबतच्या सूचना संबंधित जिल्हाधिकारी यांना देण्यात आलेल्या आहेत. तसेच आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्या कार्यालयाकडून व्हिडीओ कॉन्फरन्सीगद्वारे घेण्यात येणाऱ्या आढावा बैठकीमध्ये देखील प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्याबाबतच्या सूचना सर्व उपविभागस्तरीय समिती व जिल्हास्तरीय समितीस देण्यात येतात.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई येथील दादर परिसरातील मुंबई व्यापारी सहकारी पतपेढी मर्यादित मध्ये सर्वसामान्य नागरिकांची कोट्यावधी रुपयांची फसवणूक झाल्याबाबत

**(९) २१०३९ (०५-०१-२०२४) श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील दादर परिसरातील मुंबई व्यापारी सहकारी पतपेढी मर्यादित मध्ये नागरिकांनी गुंतवणूक केलेल्या कोट्यावधी रुपयांच्या मुदत ठेवीमध्ये अफरातफर झाल्याने गुंतवणूकदारांची फसवणूक झाली असल्याची बाब दिनांक २४ सप्टेंबर, २०२३ मध्ये त्यासुमारास उघडकीस आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करून त्याअनुषंगाने सदर पतपेढीमध्ये गुंतवणूक केलेल्या सर्वसामान्य नागरिकांना कोट्यावधी रुपयांच्या मुदत ठेवीची रक्कम परत मिळवून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (१६-०४-२०२४) :** (१) व (२) उपनिबंधक, सहकारी संस्था जी/एन विभाग, मुंबई यांचे कार्यालयात मुंबई व्यापारी सहकारी पतपेढ़ी, दादर (प.), मुंबई या संस्थेचे सभासद श्री.शांताराम लक्ष्मण निवळे यांनी त्यांच्या मुदत ठेवीची रक्कम मुदत होवुनही परत न मिळाल्याबाबत दिनांक १२/०९/२०२३ रोजी तक्रार अर्ज दाखल केला होता.श्री.निवळे यांची एकूण ठेव रक्कम रुपये ८,८७,०००/- इतकी असून यापैकी सदर संस्थेने त्यांना रुपये १,०५,०००/- इतकी ठेवीची रक्कम परत केलेली आहे. तसेच श्री.निवळे यांच्या तक्रारीनुसार उपनिबंधक, सहकारी संस्था जी/एन विभाग, मुंबई यांनी दिनांक ०७/०३/२०२४ रोजी सुनावणी घेऊन सदर पतसंस्थेला मुदत संपलेल्या ठेवीदारांच्या ठेवी परत करणेबाबत सुनावणी दरम्यान कळविले आहे.

मुंबई व्यापारी सहकारी पतपेढी, मर्या. दादर या पतसंस्थेच्या सभासदांची संख्या १९१३ असून रुपये ६,३९,४२,८१२/- इतक्या रकमेच्या मुदत ठेवी आहेत. तसेच पतसंस्थेच्या ५२ कर्जदारांकडुन रुपये ३,३८,३०,४०७/- मूळ रक्कम व त्यावरील व्याज रुपये ४,७७,६१,५५६/- इतकी रक्कम येणे बाकी आहे. सन २०२२-२३ अखेरच्या लेखापरीक्षण अहवालानुसार संस्थेचा लेखापरिक्षण वर्ग 'ड' आहे. सदर अहवालात संस्थेत अफरातफर किंवा गैरव्यवहार झाल्याबाबत नोंद नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सन २०२० च्या खरीप हंगामात झालेल्या अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना 'पंतप्रधान पीक विमा योजने' अंतर्गत नुकसान भरपाई मिळाली नसल्याबाबत

**(१०) २१०८५ (०४-०१-२०२४) श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०२० च्या खरीप हंगामात राज्यात अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना 'पंतप्रधान पीक विमा योजने' अंतर्गत विमा कंपन्यांकडून आजतागायत नुकसान भरपाई मिळाली नसल्याची माहिती दिनांक ६ ऑक्टोबर, २०२३ मध्ये त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेत सहभागी असलेल्या सहा विमा कंपन्यांपैकी चार कंपन्यांकडून २२४ कोटी

रुपयांची नुकसान भरपाई नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना देणे बाकी आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर योजनेंतर्गत सन २०२० च्या खरीप हंगामात अतिवृष्टीमुळे पिकांच्या झालेल्या नुकसानीबाबत शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात आली आहे काय, यावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (२६-०६-२०२४) :** (१) हे खरे नाही,

सन २०२० च्या खरीप हंगामात राज्यात प्रधानमंत्री पीक विमा योजना अंतर्गत अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना योजनेतील स्थानिक नैसर्गिक आपत्ती या बाबींतर्गत एकूण रुपये ६९५.३५ कोटी नुकसान भरपाई वाटप केलेली आहे.
(२) हे अंशत: खरे आहे,

सद्य:स्थितीत सहा विमा कंपन्यांपैकी चार विमा कंपन्यांकडून खरीप २०२० या हंगामातील एकूण रुपये ४५.५६ लाख रुपयांची नुकसान भरपाई शेतकऱ्यांना देणे बाकी आहे.
(३) खरीप २०२० मध्ये कोविड- १९ महामारीच्या पार्श्वभुमिवर शेतकऱ्यांना दळणवळणतील खंडामुळे विहित वेळेत (७२ तासांत) पीक नुकसानीच्या सुचना विमा कंपन्यांकडे देता न आल्याने नैसर्गिक आपत्ती (NDRF) अंतर्गत केलेले पंचनामे गृहीत धरुन शेतकऱ्यांना नुकसान भरपाई अदा करणेबाबत विमा कंपन्यांकडे पाठपुरावा सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सक्करदरा (जि.नागपूर) येथील शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालय व रुग्णालयामध्ये वनऔषधी उद्यान प्रस्तावाला मान्यता मिळण्याबाबत

**(११) २१३३४ (०५-०१-२०२४) श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सक्करदरा (जि.नागपूर) येथील शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालय व रुग्णालयामध्ये सन २०१६ च्या मंजूरीनुसार केंद्र शासन व शासनाच्या पुढाकारातून वन औषधी उद्यान तयार करण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भारतीय चिकित्सा केंद्रिय परिषदेच्या मागणीनुसार शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालयामध्ये किमान ५ ते १५ एकर परिसरामध्ये वनऔषधी उद्यान असल्याशिवाय पदवीची १०० आणि पदव्युत्तर ६० ही विद्यार्थी संख्या ७ वर्षापासून कायम ठेवता येत नाही असे निकष आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त निकष पूर्ण करण्यासाठी २०२३ मध्ये त्याबाबतचा प्रस्ताव शासनाला पाठविला होता, परंतु अद्यापही सदर प्रस्तावाला मान्यता देण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रस्तावाला मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (२३-०२-२०२४) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूरमध्ये एस.टी.महामंडळाच्या एस.टी.डेपोची संख्या वाढविण्याबाबत

**(१२) २१३५८ (०५-०१-२०२४) श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूरमध्ये एस.टी.महामंडळाच्या एकूण ८ डेपोमध्ये ४३२ बसेस असून २४ नवीन इलेक्ट्रिक बसेस चालविण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नागपूर येथील वाहतुकीची स्थिती पाहता नागपूरमध्ये डेपोची संख्या वाढविण्याबाबत काय कार्यवाही करण्यात येत आहे,
(३)असल्यास, इलेक्ट्रिक बसेस योग्य पध्दतीने रस्त्यांवर चालविण्यासाठी वेगवेगळया ठिकाणी चार्जिंग स्टेशन उभारण्यात येणार आहेत काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नागपूर येथे डेपोंची संख्या वाढविणे तसेच नागपूर येथे वेगवेगळया ठिकाणी चार्जिंग स्टेशन उभारण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२५-०४-२०२४) :** (१) रा.प.नागपूर विभागात ४३१ बसेस उपलब्ध असून सद्य:स्थितीत ई-बसेस उपलब्ध नाही.
(२) नागपूर विभागात एकूण ०८ आगार अस्तित्वात असून आगारांची संख्या वाढविणेबाबत कुठलाही प्रस्ताव विचाराधीन नाही.
(३) होय.
(४) व (५) नागपूर विभागात एकूण ०८ आगार अस्तित्वात असून ई-बसेसच्या परिचालनाकरीता चार्जिंग स्टेशन उभारण्याबाबत नियोजन करण्यात येत आहे.

---

## राज्यातील बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेचा लाभ बिगर शेतकऱ्यांना देण्याबाबत

**(१३) २१५४९ (०३-०१-२०२४) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेचा लाभ आदिवासी विभागातील शेतकऱ्यांना देण्यात येत असून उक्त योजनेमध्ये कागदपत्रांच्या किचकट अटी व शर्ती असल्यामुळे अनेक आदिवासी शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ घेता येत नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासन निर्णयानुसार नागपूर जिल्ह्यातील आदिवासी बहुल फक्त पारशिवनी व रामटेक तालुक्याचा समावेश असून अन्य तालुक्यातील आदिवासी शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ देण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आदिवासी शेतकऱ्यांकरीता ही योजना असल्याने या योजनेत अवजार पंप, परसबाग व अन्य योजनेकरीता लाभ मिळत असून सदर लाभ इतर बिगर आदिवासी भागातील शेतकऱ्यांना देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली व करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (१४-०६-२०२४) :** (१) व (२) हे खरे नाही. राज्यातील अनुसुचित जमातीच्या शेतकऱ्यांना सिंचनाची शाश्वत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना (क्षेत्रांतर्गत व क्षेत्राबाहेरील) राबविण्यात येत आहे. नागपूर जिल्ह्यातील फक्त रामटेक हा आदिवासी बहूल तालुका असल्याने या तालुक्यातील पात्र शेतकऱ्यांना या योजनेतील आदिवासी क्षेत्रांतर्गत योजनेचा लाभ दिला जातो. तसेच, नागपूर जिल्ह्यामधील इतर सर्व तालुक्यातील पात्र आदिवासी शेतकऱ्यांना आदिवासी क्षेत्राबाहेरील योजनेचा लाभ दिला जातो.
(३) बिरसा मुंडा कृषी क्रांती (क्षेत्रांतर्गत) व (क्षेत्राबाहेरील) या दोन्ही योजनेंतर्गत पंपसंच, परसबाग व इतर घटकांचा लाभ अनुसुचित जमातीच्या सर्व पात्र शेतकऱ्यांना देण्यात येतो. तसेच इतर सर्व पात्र शेतकऱ्यांना कृषी विभागाच्या अन्य योजनांमधून सदर लाभ देण्यात येतात.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी व डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला या दोन कृषी विद्यापीठांचे विभाजन करून स्वतंत्र कृषी विद्यापीठ स्थापन करण्याबाबत

**(१४) २१७१६ (०४-०१-२०२४) श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी व डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला या दोन कृषी विद्यापीठांचा विस्तार लक्षात घेता या विद्यापीठांचे विभाजन करून स्वतंत्र कृषी विद्यापीठ स्थापन करण्याच्या अनुषंगाने दिनांक १९ ऑगस्ट, २०१३ रोजीच्या शासन निर्णयान्वये डॉ.वाय.एस.पी.थोरात, माजी अध्यक्ष नाबार्ड यांचे अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती नियुक्त करण्यात आली होती व सदरहू समितीने आपला अहवाल दिनांक ६ सप्टेंबर, २०१५ रोजीच्या पत्रान्वये शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू अहवालाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याकरीता कृषी विभागाच्या दिनांक १४ मे, २०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये डॉ.वेंकटेश्वरल्लू, कुलगुरू, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती व सदरहू समितीने दिनांक २९ डिसेंबर,

२०१५ रोजीच्या पत्रान्वये आपला अहवाल शासनास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी व डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला या दोन कृषी विद्यापीठांचे विभाजन करून स्वतंत्र कृषी विद्यापीठ स्थापन करण्याच्या अनुषंगाने उक्त नमूद दोन्ही समित्यांनी सादर केलेल्या अहवालात कोणत्या बाबी, शिफारसी व मुद्दे नमूद करण्यात आले आहेत काय,
(४) असल्यास, त्यानुषंगाने उक्त नमूद दोन्ही कृषी विद्यापीठांचे विभाजन करून स्वतंत्र कृषी विद्यापीठ स्थापन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत असल्यास त्याचा तपशील काय आहे, नसल्यास त्याची कारणे काय आहेत,
(५) सदरहू प्रकरणी स्वतंत्र कृषी विद्यापीठ स्थापन करण्याबाबत शासनाची नेमकी भूमिका काय असून या प्रकरणी शासन सकारात्मक असल्यास याबाबतची कार्यवाही शासन किती कालावधीत पूर्ण करणार आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (१८-०६-२०२४) :** (१) होय हे खरे आहे,
(२) होय हे खरे आहे,
(३) डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे विभाजन करुन पूर्व विदर्भासाठी स्वतंत्र कृषी विद्यापीठ स्थापन करण्यासाठी सन २०१३ मध्ये डॉ.वाय.एस.पी. थोरात यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीच्या शिफारशी खालीलप्रमाणे आहे:-

१.दोन्ही कृषी विद्यापीठांचे विभाजन करण्यासारखी परिस्थिती आहे.

२. पूर्व विदर्भात सिंदेवाही किंवा मूल जि.चंद्रपूर व उत्तर महाराष्ट्रासाठी धुळे किंवा नंदुरबार येथे स्थापन करण्यात यावे.

३.नवीन कृषी विद्यापीठांच्या स्थापनेसाठी Land Grant Model ऐवजी Hub and Spoke Model वापरावे, जेणेकरुन नवीन कृषी विद्यापीठांसाठी जमिनी उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाचा जाणारा वेळ वाचेल. तसेच समितीने नवीन संशोधन संस्था व कृषी महाविद्यालये स्थापन करण्याची शिफारस केली आहे.

सन २०१५ मध्ये स्थापन केलेल्या डॉ. वेंकटेश्वरल्लू समितीच्या अहवालातील शिफारसी पुढीलप्रमाणे:- १.पुर्व विदर्भासाठी सिंदेवाही किंवा मूल जि.चंद्रपूर येथे नवीन कृषी विद्यापीठ स्थापन करण्यासारखी परिस्थिती आहे.

२.मुल जि.चंद्रपूर येथे ६२ हेक्टर जागा उपलब्ध आहे आणि जिल्हाधिकारी यांनी दिलेल्या माहितीनुसार मूल पासून १३ कि.मी. अंतरावरील बाबा आमटे ट्रस्टची १६० हे.जमीन उपलब्ध होऊ शकेल.

३. उत्तर महाराष्ट्रात धुळे आणि जळगांव ही ठिकाणे नवीन कृषी विद्यापीठासाठी योग्य आहेत. नवीन विद्यापीठाला १ T.M.C. पाण्याची आवश्यकता असल्याने दोन्ही ठिकाणाची शक्तीस्थळे व दुर्बलतेचा विचार करून निर्णय घ्यावा लागेल.

४.नवीन कृषी विद्यापीठाच्या मुख्यालयी प्रशासकीय इमारत, पदव्युत्तर शिक्षण विभाग, संशोधन केंद्रे, बियाणे विभाग तयार करावा लागेल. या विद्यापीठांच्या कार्यक्षेत्रातील शासकीय व खाजगी कृषी व संलग्न महाविद्यालये या विद्यापीठांच्या अधिनस्त येतील. नवीन कृषी विद्यापीठात काही

महाविद्यालये नव्याने तयार करावा लागतील तर मूळ विद्यापीठात काही महाविद्यालये स्थापन करावी लागतील.

५. पुर्व विदर्भासाठीच्या नवीन कृषी विद्यापीठासाठी धान संशोधन केंद्र व उत्तर महाराष्ट्रातील नवीन कृषी विद्यापीठासाठी फलोत्पादन पिकांवरील हवामान बदलाच्या परिणामांचा अभ्यासासाठी संशोधन केंद्र निर्माण करावे.

६.नवीन कृषी विद्यापीठासाठी नव्याने ४९८ पदे निर्माण करण्याची शिफारस करण्यात आली आहे.

७.पूर्व विदर्भातील नवीन कृषी विद्यापीठासाठी प्रथम ५ वर्षासाठी ६२०.४४ कोटी अधिकचा निधी आवश्यक राहील.

८.उत्तर महाराष्ट्रातील नवीन कृषी विद्यापीठासाठी प्रथम ५ वर्षांसाठी ५५९.४० कोटी अधिकचा निधी आवश्यक राहील.

९.महाराष्ट्र कृषी विद्यापीठे, कायदा १९८३ मध्ये बदल करून नव्याने कृषी विद्यापीठे निर्माण करता येतील.

(४) व (५) कृषी विद्यापीठांचे विभाजन करण्यासंदर्भात नेमलेल्या डॉ. वाय. एस. पी. थोरात व डॉ. वेंकटेश्वरलू समितीच्या अहवालाच्या अनुषंगाने अदयाप शासन स्तरावर निर्णय घेण्यात आलेला नाही. सद्य:स्थितीत चंद्रपूर जिल्ह्यात वरोरा येथे शासन अनुदानित कृषी महाविद्यालय कार्यरत आहे. तसेच कृषी शिक्षण, कृषी सल्ला व सेवा देऊन शेतकऱ्यांच्या पिकाची उत्पादकता वाढ व पर्यायाने आर्थिक स्तर उंचावून प्रगतीस चालना देण्याकरीता तसेच पूर्व विदर्भातील विकासाचा अनुशेष भरुन काढण्याकरीता मूल, जि.चंद्रपूर येथे शासकीय कृषी महाविद्यालय स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. तसेच महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी अंतर्गत मौजे काष्टी, ता.मालेगाव, जि.नाशिक येथे कृषी विज्ञान संकुल स्थापन करुन सदर संकुलांतर्गत शासकीय महाविद्यालये स्थापन करण्याबाबत विधानमंडळाच्या सन २०२० च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात घोषित करण्यात आले होते. त्यानुसार मौजे काष्टी, ता.मालेगाव, जि.नाशिक येथील कृषी विज्ञान संकुलात एकूण ५ शासकीय कृषी/कृषी संलग्न महाविद्यालये स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुषंगाने या कृषी विज्ञान संकुलात एकूण पाच शासकीय महाविद्यालये सन २०२०-२१, २०२१-२२ व २०२२-२३ या शैक्षणिक वर्षापासून सुरु करण्यात आलेली आहेत.

डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला यांनी कृषी विद्यापीठाचे विभाजन करण्याऐवजी पुर्व विदर्भातील संशोधन केंद्रांचे समक्षीकरण व बळकटीकरण होणे आवश्यक आहे, यासाठी १०० कोटी निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी कृषी विद्यापीठाने केली आहे.

(६) प्रश्न उदभवत नाही.

---

## पिंपरी-चिंचवड शहरातील पूर्णानगर येथील हार्डवेअरच्या दुकानास आग लागल्याबाबत

**(१५) २१८२५ (०५-०१-२०२४) श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी-चिंचवड शहरातील पूर्णानगर येथील हार्डवेअरच्या दुकानास दिनांक ३० ऑगस्ट, २०२३ रोजी आग लागून एक महिन्यांहून अधिक काळ पूर्ण होऊनही शहरातील सर्व दुकानांचे अग्निशमन विभागाकडून सर्वेक्षण झाले नसल्याचे माहे ऑक्टोंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त हार्डवेअर दुकानास लागलेल्या आगीनंतर महानगरपालिकेकडून शहरातील सर्व दुकानांचे अग्निशमन विभागाकडून सर्वेक्षण करुन तेथे अग्निशमन यंत्रणा कार्यान्वित आहे की नाही, तसेच दुकानदार दुकानातच वास्तव्यास आहे कि नाही याची तपासणी करणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले होते, हे ही हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पिंपरी चिचंवड येथील दुकानांची अग्निशमन विभागाकडून तपासणी करुन अग्निप्रतिबंधक उपाययोजना करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२९-०२-२०२४) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) आतापर्यंत सर्वेक्षण केलेल्या सुमारे ४३,९४१ मिळकतींपैकी २,४२३ धोकादायक मालमत्तेची ओळख पटविण्यात आली असून, त्यापैकी ६२२ मिळकतींना नोटीस देण्यात आलेली आहे व उर्वरीत मालमत्तांना नोटीस देण्याची कार्यवाही कार्यान्वित आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कोल्हापूर जिल्ह्यातील सुमारे ४४ हजार शेतकऱ्यांची पेन्शन योजना धोक्यात आली असल्याबाबत

**(१६) २२०२७ (०३-०१-२०२४) श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील ४४ हजार ५७८ शेतकऱ्यांनी अद्याप विविध कारणांमुळे“ई-केवायसी” व आधार लिंक केली नसल्यामुळे त्यांना पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेंतर्गत मिळणाऱ्या निवृत्तीवेतनापासून वंचित राहावे लागणार असल्याचे माहे सप्टेंबर, २०२३ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाने याकरीता दिनांक ३० सप्टेंबर,२०२३ अखेर मुदत दिली असून, सदर कालावधीपर्यंत शेतकऱ्यांनी ई-केवायसी व आधार लिंक केले नाही तर निवृत्तीवेतन कायमचे बंद करण्याचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेंतर्गत कोल्हापूर जिल्ह्यातील पात्र शेतकऱ्यांना “ई-केवायसी” व आधार लिंक करण्यास केंद्र शासनाने मुदतवाढ देण्याकरीता शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (१९-०६-२०२४) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

केंद्र शासन पी. एम. किसान योजनेच्या लाभासाठी ई-केवायसी व बँक खाती आधार संलग्न करणे

या बंधनकारक बाबीची पूर्तता करणाऱ्या लाभार्थींना लाभ अदा करणार आहे. त्यानुसार २८ फेब्रुवारी २०२४ रोजी वितरीत केलेल्या १६ व्या हप्त्यावेळी लाभासाठी बंधनकारक केलल्या बाबींची पूर्तता केलेल्या लाभार्थ्यांना लाभ अदा झालेला आहे.

(२) हे खरे नाही.

केंद्र शासनाने पी. एम. किसान योजनेच्या लाभासाठी लाभार्थीने ई-केवायसी व बँक खाते आधार संलग्न करणे या बंधनकारक केलेल्या बाबीची पूर्तता केल्यावर त्यांचा योजनेचा लाभ बंद न होता पूर्ववत केला जाईल.

(३) योजनेच्या लाभासाठी ई- केवायसी व बँक खाती आधार संलग्न करणे या बाबी लाभार्थींनी स्वत: करावयाच्या असून त्यासाठी लाभार्थी स्वत: प्रत्यक्ष उपस्थित असणे आवश्यक आहे.

केंद्र शासनाने यासाठी दिनांक १२ फेब्रुवारी, २०२४ पासून गावपातळीवरील मोहिमांव्दारे CSC व IPPB यांना प्रलंबित लाभार्थीच्या e-KYC व बँक खाती आधार संलग्न करण्याचे निर्देश दिल्यानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

क्षेत्रिय पातळीवर मोहीम स्वरुपात कामकाज केल्याने दिनांक ५/०४/२०२४ पर्यंत कोल्हापूर जिल्ह्यात एकुण ३२,८५७ लाभार्थ्यींची ई-केवायसी व ३४, ६५१ लाभार्थींची बँक खाते आधार संलग्न करणे या बाबींची पूर्तता करण्यात आली आहे. उर्वरीत लाभार्थ्यींची पूर्तता करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शेतकऱ्यांकडून सक्तीची कर्ज वसुली करीत असल्याबाबत

**(१७) २२०५१ (०४-०१-२०२४) श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून सुरू असलेल्या सक्तीच्या कर्ज वसुली विरोधात नाशिक येथील गोल्फ क्लब मैदानाजवळ शेतकऱ्यांनी शंभर दिवस धरणे व उपोषण आंदोलन करून शासनाला निवेदन सादर केले असल्याची बाब माहे, ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (१४-०६-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) नाशिक जि.म.स. बँकेची जिल्ह्यातील एकूण ५५,७३७ थकबाकीदार सभासदांकडे रुपये २३६५.६८ कोटी इतकी रक्कम थकीत आहे. सदर थकबाकीमुळे बँक आर्थिकदृष्टया अडचणीत आलेली असून ठेवीदारांना ठेवी परत करण्यास बँकेस अडचणी येत आहेत. त्यामुळे अशा थकबाकीदारांकडुन कर्ज वसुलीसाठी बँक प्रयत्नशील आहे.

त्यानुसार मा.उपमुख्यमंत्री (वित्त) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २६/०७/२०२३ रोजी पार पडलेल्या बैठकीत तसेच मा.मंत्री (सहकार) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ३०/०८/२०२३ रोजी

आयोजित बैठकीत नाशिक जि.म.स. बँकेच्या कर्ज वसुलीच्या अनुषंगाने चर्चा करण्यात आली. सदर बैठकीतील निर्णयानुसार नाशिक जि.म.स. बँकेने रिझर्व बँक / राज्य सहकारी बँकेच्या निकषानुसार एन. पी. ए. वर्गवारीत समाविष्ट होणाऱ्या संस्थेच्या थकबाकीदार सभासदांकरीता पीक कर्ज ८ टक्के व मध्यम मुदत कर्ज १० टक्के व्याजदराने आकारणी करुन
दिनांक १९/१०/२०२३ पासून नविन सामोपचार कर्ज परतफेड योजना सुरु करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून माहिती व जनसंपर्क विभागातील पदभरती करण्याबाबत

**(१८) २२२७४ (११-०१-२०२४) श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने उपसंचालक, जिल्हा माहिती अधिकारी व माहिती अधिकारी या पदांसाठी भरती प्रक्रियेची जाहिरात दिनांक ३० डिसेंबर, २०२२ रोजी प्रसिध्द केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २००७ नंतर माहिती व जनसंपर्क विभागात पदभरती झाली नसल्यामुळे सदरची भरती प्रक्रिया राबविणे अपेक्षित असतानाही अनेक महिन्यांपासून परिक्षेची तारीख जाहीर करण्यात आली नसल्याने हजारो परिक्षार्थी परिक्षेची प्रतिक्षा करीत असल्याचे दिनांक २० सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून माहिती व जनसंपर्क विभागातील पदभरती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१०-०६-२०२४) :** (१) हे खरे आहे.
सदर पदांच्या जाहिराती (जा.क्र.१२९/२०२२, १३०/२०२२ व १३१/२०२२) दिनांक ३० डिसेंबर, २०२२ रोजी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आल्या आहेत.
(२) सदर पदांसाठी चाळणी परीक्षा घेण्यात येवुन परीक्षेची तारीख, परीक्षा योजना, अभ्यासक्रम, कार्यपध्दत स्वतंत्रपणे घोषित करण्यात येईल असे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या दिनांक २३ मे, २०२३ च्या प्रसिध्दीपत्रकाव्दारे घोषित करण्यात आले आहे.
दिनांक ३० डिसेंबर, २०२२ रोजी आयोगाकडून सदर पदांची जाहिरात प्रसिध्द झालेली असून या पदांची परीक्षा योजना व अभ्यासक्रम दिनांक १५ जानेवारी, २०२४ रोजी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला आहे. भरती प्रक्रियेची कार्यवाही महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून करण्यात येत आहे.
(३) सदर पदांसाठी चाळणी परीक्षा घेण्यात येवुन परीक्षेची तारीख, परीक्षा योजना, अभ्यासक्रम, कार्यपध्दत स्वतंत्रपणे घोषित करण्यात येईल असे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या दिनांक २३ मे, २०२३ च्या प्रसिध्दीपत्रकाव्दारे घोषित करण्यात आले आहे.
दिनांक ३० डिसेंबर, २०२२ रोजी आयोगाकडून सदर पदांची जाहिरात प्रसिध्द झालेली असून या पदांची

परीक्षा योजना व अभ्यासक्रम दिनांक १५ जानेवारी, २०२४ रोजी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला आहे. भरती प्रक्रियेची कार्यवाही महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून करण्यात येत आहे.
(४) सदर पदांसाठी चाळणी परीक्षा घेण्यात येवुन परीक्षेची तारीख, परीक्षा योजना, अभ्यासक्रम, कार्यपध्दत स्वतंत्रपणे घोषित करण्यात येईल असे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या दिनांक २३ मे, २०२३ च्या प्रसिध्दीपत्रकाव्दारे घोषित करण्यात आले आहे.
दिनांक ३० डिसेंबर, २०२२ रोजी आयोगाकडून सदर पदांची जाहिरात प्रसिध्द झालेली असून या पदांची परीक्षा योजना व अभ्यासक्रम दिनांक १५ जानेवारी, २०२४ रोजी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला आहे. भरती प्रक्रियेची कार्यवाही महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून करण्यात येत आहे.

## मुंबई महानगर क्षेत्रातील कांदळवन क्षेत्रात सीसीटीव्ही बसविण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबत

**(१९) २२६१४ (०३-०१-२०२४) श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगरक्षेत्रात कांदळवनांची १०६ संवेदनशील ठिकाणे असून या ठिकाणी अतिक्रमण व निर्माणाधीन अवैध बांधकामांना प्रतिबंध घालण्यासाठी दोन वर्षांपूर्वी वन विभागाने सीसीटीव्ही बसविण्याच्या घेतलेल्या निर्णयाची अद्याप अंमलबजावणी झाली नसल्याचे दिनांक ३० ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई महानगर क्षेत्रातील कांदळवन क्षेत्रात शासनाने सर्वेक्षण करुन सीसीटीव्ही बसविण्याबाबतच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार (२८-०६-२०२४) :** (१) व (२) मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील कांदळवन क्षेत्रामध्ये सुरवातीस १०६ संवेदनशील ठिकाणी सीसीटीव्ही स्थापित करणे आवश्यक असल्याचे प्राथमिक अभ्यासातून निदर्शनास आले होते. तद्नंतर ठाणे, पनवेल व उरण तालुक्यामध्ये काही नवीन कांदळवनाचे क्षेत्र वन विभागाने ताब्यात घेतल्यामुळे, वाढ झालेले क्षेत्र गृहीत धरुन सल्लागार / तज्ञ यांनी फेर चौकशीअंती सादर केलेल्या अहवालानुसार १९५ ठिकाणी ६६९ सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने प्रकल्प सल्लागार यांनी विसृत प्रकल्प आराखडा (DPR) व RFP (Request for proposal) तयार केला असून मान्यतेची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

## बायगाव खुर्द (जि.बुलढाणा) येथील २९५ शेतकरी प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेच्या लाभापासून वंचित राहिल्याबाबत

**(२०) २२७१३ (०३-०१-२०२४) श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बायगाव खुर्द (जि.बुलढाणा) येथील २९५ शेतकरी प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेच्या लाभापासून वंचित राहिल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील शेतकऱ्यांनी दिनांक १७ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास नदीपात्रात आंदोलन करून शासनाला निवेदन सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरील निवेदनात कोणत्या मागण्या करण्यात आल्या आहेत, सदरील मागण्यांच्या पूर्ततेच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (१९-०६-२०२४) :** (१) हे, अंशत: खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) केंद्र पुरस्कृत "प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (PM KISAN) योजना" अंतर्गत पात्र शेतकऱ्यांच्या खात्यात पी. एम. किसान योजनेचा लाभ मिळणे करीता श्री.तेजराव उत्तमराव मुंढे व इतर शेतकरी ता.देऊळगांव राजा यांनी निवेदन सादर केले होते.

पी. एम. किसान पोर्टलवर ता.देऊळगांव राजा तालुक्यातील मौजे बायगांव खुर्द येथील २९५ लाभार्थींना तहसिलस्तरावरुन नजरचूकीने अपात्र ठरविण्यात आले होते. त्यांना जिल्हा नोडल अधिकारी, पी. एम. किसान तथा जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, बुलढाणा यांनी प्रस्तावित केल्यानुसार आयकर भरणा करणाऱ्या २ लाभार्थ्यांना वगळून उर्वरीत २९३ लाभार्थ्यांना पात्र करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.